परमाणु ऊर्जा केंद्रीय विद्यालय, मुंबई

प्रथम सत्रांत परीक्षा - (२०२३-२४)

वर्ग - ७वा                                                                                          गुण - ४०

विषय - मराठी (तृतीय भाषा)                                                                  वेळ - १तास ३०मि.

---------------------------------------------------------------------------------------------------------------

(प्रश्न-१ला) खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे द्या.                                   (गुण ५)

आपल्या बिया, साल आणि पाने यांच्या औषधी फायद्यांमुळे निंबाचे झाड खेडेगावातील औषधालय म्हणून ओळखले जाते. संस्कृत मध्ये त्याला 'अरिष्ट' म्हणतात त्याचा अर्थ आहे परिपूर्ण अविनाशी आणि संपूर्ण. कीटकनाशक म्हणून निंबाचे तेल महत्त्वाची भूमिका बजावते आणि डासांच्या निवारणासाठी ही पर्याय ठरतो. निंबाच्या बियांचे गोळे खत म्हणून वापरता येतात निंबाच्या पानांचा लगदा कांजीन्यावर उपयोगी पडतो. निंबांच्या डहाळ्यांना 'दातून' म्हणतात आणि त्या खेड्यामध्ये टूथब्रश म्हणून वापरल्या जातात.

१) खेडेगावातील औषधालय म्हणून कोण ओळखले जाते?

२) कीटकनाशक म्हणून निंबाचे काय वापरले जाते?

३) निंबाच्या पानांचा लगदा कशावर उपयोगी पडतो?

४) निंबाच्या डहाळ्यांना काय म्हणतात?

५) संस्कृत मध्ये लिंबाला काय म्हणून ओळखले जाते?

(प्रश्न-२रा) खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा. (कोणतेही - १)                                   (गुण ४)

१) टप् टप् पडती अंगावरती --------------------

भिर् भिर् भिर् भिर्  ----------------------------

-------------------------- ऊनसावली विणते जाळी

येतो वारा पहा --------------------------------

(किंवा)

२) दिला -घेतला---------------------

रानातला----------------------------

-------------------- सारेजण

गुण्यागोविंदान -------------------

(प्रश्न-३रा) कंसात दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा. (कोणतेही ४)

(गुण ४)

(पोशिंदा, गालावर, घटाघटा, सगळीकडे, ठणठणीत असते)

१) दूर उडूनिया जाता,आसू येती ---------------

२) शेतकऱ्याला भारतात ---------------- म्हणतात.

३) ----------------- हिरवेगार गवत उगवले होते.

४) सुलेमानचाचा रोज सकाळी फिरायला जातात,त्यामुळे त्यांची तब्येत ---------------

५) मी --------------------- पाणी प्यायलो.

(प्रश्न-४था) खालील प्रश्नांची उत्तरे द्या. (कोणतेही ५) (गुण ५)

१) श्यामने कोणता निश्चय केला होता?

२) कवीच्या अंगणात पाखरे का येतात?

३) कर्णागड कुठे वसलेला आहे?

४) कवितेतील मुलांचे गाणे कधी जुळून येते?

५) मुलाला धन्य झाल्यासारखे केव्हा वाटले?

६) गवत खुशीने का डुलते?

७) रानमेवा कुठे उगवला आहे?

(प्रश्न-५वा) विरुद्धार्थी शब्द लिहा. (कोणतेही ३) (गुण ३)

(नवा, अपयश गरम, बाहेर)

१) थंड ×---------------

२) जुना ×---------------

३) यश ×---------------

४) आत ×---------------

(प्रश्न-६वा) समानार्थी शब्द लिहा. (कोणतेही ३) (गुण ३)

१) (ढीग, झोका, चव, पुरातन)

२) पौराणिक - ---------------

३) झोपाळा - ---------------

४) स्वाद - ---------------

५) रास - ---------------

(प्रश्न-७वा) वचन बदला. (कोणतेही २) (गुण २)

१) गाडी - ----------------

२) चेहरा - ----------------

३) पेढे - ----------------

(प्रश्न-८वा) लिंग बदला. (कोणतेही २) (गुण २)

१) शिक्षक - ----------------

२) विद्यार्थी - ----------------

३) भाऊ - ----------------

(प्रश्न-९वा) खालील वाक्यातील क्रियाविशेषण अव्यय अधोरेखित करा. (कोणतेही २) (गुण २)

१) आईने आशाला शंभरदा बजावले.

२) माझे हसणे क्षणोक्षणी वाढतच गेले.

३) मंदा लिहिताना नेहमी चुका करते.

(प्रश्न-१०वा) खालील वाक्यांतील शब्दयोगी अव्यय अधोरेखित करा. (कोणतेही २) (गुण २)

१) आमच्या शाळेसमोर वडाचे झाड आहे.

२) आमचा कुत्रा मला नेहमी मित्राप्रमाणे भासतो.

३) मुलांनी फुगेवाल्या भोवती गर्दी केली.

(प्रश्न-११) खालील शब्दात लपलेले शब्द लिहा. (कोणतेही २) (गुण २)

१) कुरणावरती - --------------------

२) झाडाखाली - --------------------

३) ऊनसावली - --------------------

(प्रश्न-१२वा) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. (गुण ६)

१) माझी सहल.

२) एक पाळीव प्राणी.